|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव)**

=====================================================

जा.क्र.कबचौउमवि/१७/क्रीडा/ **६०** /२०२३ दि. १५/०५/२०२३

प्रति,

**१) मा.प्राचार्य/संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**

**२) मा. संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग**

**विषय :- विद्यापीठ अध्यादेश १६३ नुसार शै.वर्ष २०२२-२३ मध्ये आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना गुणलाभ देणे बाबत..**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध ठिकाणी झालेल्या आंतरविद्यापीठ/अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना सुधारीत अध्यादेश १६३ नुसार १० गुण देण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने अशा खेळाडूंच्या गुणयाद्या तयार कराव्यात. तयार केलेल्या गुणयाद्या ई-पध्दतीने सादर करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे वापरावी.

१) विद्यापीठ अध्यादेश १६३ तरतुदीनुसार आंतरविद्यापीठ/अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी पात्र खेळाडूंच्या गुणयाद्या त्रुटींचे निराकरण झाल्यानंतर MKCL ने विकसित केलेला **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे प्रोत्साहनपर १० गुणांची नोंदणी करावयाची आहे.

२) अर्ज व विद्याशाखानिहाय याद्या सादर करतांना त्यावर संपूर्ण माहिती, विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक **(P.R.Number)** आणि परीक्षेसाठी विद्यापीठाने दिलेला बैठक क्रमांक **(Seat Number)** तसेच त्यावर मा.प्राचार्य/संचालक तसेच शा.शि. संचालक यांच्या स्वाक्षऱ्या. अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचा माहे मे/जून/जुलै-२०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे प्रवेशपत्राची **(Hall Ticket)** सत्यप्रत जोडणे आवश्यक आहेत.

३) सदर अर्ज शा.शि. संचालकांकडून पडताळणी करुन मा. प्राचार्यांच्या शिफारसीसह क्रीडा विभागाकडे **दि. २२ मे,२०२३** पर्यंत जमा करावेत. विलंबाने प्राप्त होणारे अर्ज स्वीकृत केले जाणार नाहीत.

४) विद्यापीठ अध्यादेश १६३ मधील तरतुदीनुसार **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे तयार झालेल्या गुणयाद्या व सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र महाविद्यालय लॉगिन मध्ये **Assement Data Entry-->> Report >> Marks List** या **Link** द्वारे तयार कराव्यात.

५) **Software** द्वारे तयार केलेल्या गुणयाद्या प्रिंट अचुक असल्याची खात्री संबंधित शा.शि. संचालकांनी करावी. काही दुरुस्त्याअसल्यास अश्या दुरुस्त्या **Software** मध्ये घेण्यात याव्यात. त्याची **Correction List Print** घेऊन त्यावर शा.शि. संचालक,मा.प्राचार्य/संचालक यांनी सदर **Software Print** प्रमाणित करुन स्वाक्षरी करावी. तसेच **Submit Data** विद्यापीठाच्या **link** वर **click** करुन **data** विद्यापीठास **online submit** करावा. तसेच **hard copy** दि. **२२/०५/२०२३ ते २५/०५/२०२३** या दरम्यान सादर करावी. दि. २२/०५/२०२३ पासून **online** सादर करावयाची **link** सुरु करण्यात येईल व दि. २२/०५/२०२३ रोजी **online** सादर करावयाची link बंद करण्यात येईल.

६) विद्यापीठ अध्यादेश १६३ मधील तरतुदीनुसार **Assement Data Entry Sofware (ADES)** गुणयाद्या तयार करतांना एखाद्या विद्यार्थ्यांचा **P.R.No., Seat No**. उपलब्ध होत नसेल त्यांनी खालील नमुन्यात प्रोत्साहनपर गुणयादी तयार करुन विद्यापीठात पत्रकात नमूद कालावधीत ई-पध्दतीने पाठवावी.

| Sr. No. | Name of the Student | Class | PRN No. | Seat No. | Sports Event Name | Marks 10 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

कृपया,पत्रकातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करुन **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे किंवा तक्त्यातील गुणयाद्या हया विद्याशाखा, वर्गनिहाय, याद्या नमूद कालावधीत, नमुद ई-मेलवर दि**. २५/०५/२०२३** पर्यंत पाठवावेत. त्यांची हार्डकॉपी दि. **२५/०५/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या क्रीडा विभागात सादर कराव्यात.

कळावे-धन्यवाद !

**टीप:-१) अध्यादेश १६३ नुसार विद्यार्थी खेळाडूंचे गुणलाभाकरिता आंतरविद्यापीठ/अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडूंचा प्रस्ताव मागविण्यासाठी जा.क्र.कबचौउमवि/१७/क्रीडा/५०/२०२३, दि.३१/०३/२०२३ अन्वये, परिपत्रकानुसार कळविण्यात आलेले होते. त्यानुसार काही महाविद्यालयांचे प्रस्ताव ही प्राप्त झालेले आहेत. परंतु, ज्या ज्या महाविद्यालयांनी या पूर्वी प्रस्ताव पाठलेले असतील व ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविलेले नसतील अशा सर्व महाविद्यालयांनी या परिपत्रकाप्रमाणे माहिती भरुन पाठवावी, तसेच परिपत्रकाप्रमाणे माहिती न पाठविल्यास तसेच चूकीची किंवा अपूर्ण माहिती पाठविण्यास महाविद्यालय जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

आपला विश्वासू,

(डॉ. दिनेश पाटील)
**क्रीडा संचालक**

**टिप** :-

**१)** प्रोत्साहनपर गुणयाद्या **Assement Data Entry Sofware (ADES)** मध्ये तयार करतांना अडचण निर्माण झाल्यास विद्यापीठाच्या ई-सुविधा **(MKCL)** कक्ष दुरध्वनी क्र. **०२५७-२२५८४१८** वर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

**२) Assement Data Entry Sofware (ADES)** तयार केलेल्या गुणयाद्या प्रमाणीत करुन शक्य तितक्या लवकरात लवकर सादर कराव्यात. जेणेकरुन पुढील कार्यवाही करीता सदर गुणयाद्या परीक्षा विभागाकडे वर्ग करता येतील.

**प्रत**:-

१) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव
२) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३) विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४) विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
६) पध्दती विश्लेषक, संगणक केंद्र, संगणक शास्त्र विभाग, कबचौउमवि, जळगाव
७) समन्वयक, ई-सुविधा **(MKCL)** कक्ष, कबचौउमवि, जळगाव

**Post Box No.80, Umavi Nagar, Jalgaon (M.S)   Tel.No.0257-2020068,   Fax No- 0257-2258406**
**Mobile – 94227761116, 9421431351   E-Mail - dapatil@nmu.ac.in, dapnmusports@rediffmail.com**